डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
अर्थ व प्रशासन विभाग

---

जा. क्र. अप्रवि/पेन्शन/ ३४८१ /२०२१ दिनांक १०/१२/२०२१

## परिपत्रक

विषय : जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती झाल्याने त्यांची मुळसेवा पुस्तकाची पडताळणी करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने कृषि विद्यापीठ आणि संलग्न शैक्षणिक संस्था आणि कार्यालय मधील शिक्षक/शिक्षकेत्तर, अधिकारी/कर्मचारी यांना १ जानेवारी २०१६ पासून ७वा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. त्याअन्वये सबंधीत समितीने ७व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्तिची केलेली होती. परंतू जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी (निवृत्त वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारक) यांची ७व्या वेतन आयोगानुसार झालेली वेतन निश्चितीची फेरतपासणी करण्याकरीता खालीलप्रमाणे विद्यापीठ स्तरावर समिती स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नांव पदनाम |
|---|---|
| १ | श्री.एस.पी.जाधव, सहायक लेखाधिकारी, नियंत्रक कार्यालय, डॉ.पंदेकृवि, अकोला |
| २ | श्री.मोंडोकार, सहायक लेखाधिकारी, नियंत्रक कार्यालय, डॉ.पंदेकृवि, अकोला |
| ३ | श्री.जी.एस.काकडे, सहा. कुलसचिव, कृषि अभि.व तांत्रिकी महाविद्यालय,डॉ.पंदेकृवि, अकोला |
| ४ | श्री. प्रदीप वावरे, शाखा सहायक, कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ.पंदेकृवि, अकोला, |
| ५ | श्री.उमाळे, शाखा सहायक कृषि वनस्पती शास्त्र विभाग, डॉ.पंदेकृवि, अकोला |

दिनांक १३/१२/२०२१ पासून सर्व विभाग/कार्यालय आणि सबंधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी आस्थापना सबंधीत कर्मचा-यांना मुळसेवा पुस्तके फेरतपासणी करण्याकरीता समिती मार्फत करुन घेण्याविषयी निर्देशीत करावे जेणेकरुन सेवानिवृत्त/कुटूंबनिवृत्त वेतन धारकांना थकबाकी वेतन लाभ प्रदेय करणे सुलभ होईल.

नियंत्रक
डॉ.पंदेकृवि, अकोला

प्रतिलीपी:

१. मा.कुलगुरु यांचे स्विय सहायक यांना आदरनिय कुलगुरु महोदय, डॉ.पंदेकृवि, अकोला यांचे माहितीस्तघ सादर
२. मा.कुलसचिव, डॉ.पंदेकृवि,अकोला यांना माहितीकरीता सादर
३. सर्व विभाग प्रमुख/योजना प्रमुख/कार्यालय प्रमुख /आहरण संवितरण अधिकारी, डॉ.पंदेकृवि,अकोला यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त आस्थापना विभागांना निर्देशीत करावे.
४. सहयोगी अधिष्ठाता, कृषि अभि./विभाग प्रमुख, कृषि अर्थशास्त्र/विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र डॉ.पंदेकृवि,अकोला यांना विनंती की, आपल्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना उपरोक्त बाबत निर्देश देण्यात यावे.
५. वेतन व लेखाधिकारी डॉ.पंदेकृवि,अकोला /नागपूर
६. प्रभारी अधिकारी, संगणक केन्द्र, डॉ.पंदेकृवि,अकोला यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.